# अंक - ५०

## दिनांक:- ०५/१२/२०१६ ते १०/१२/२०१६.

## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.

जावक क्रमांक १०८१०/२०१६ दिनांक:- 22 DEC 2016

**भाग १:- बदली/पदोन्नती/नेमणुक :-**

**बदली:-**

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/आं.जि.बदली/कार्यमुक्त-धायगुडे/१०३१९/२०१६ वाशिम दिनांक ५/१२/२०१६ अन्वये मुंबई पोलीस नियमावली भाग-१ मधिल नियम क्रमांक १६७(३) (एन) च्या तरतुदीनुसार आणि संबंधीत घटक प्रमुख यांनी दिलेलया स्विकृती नुसार तसेच मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांनी दिलेलया ना-हरकत प्रमाणपत्रानुसार वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील नेमणुकीस असलेले खालील नमुद चालक पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकामध्ये चालक पोलीस शिपाई या पदावर आंतर जिल्हा बदलीवर स्विकारण्यास तयार असल्याने नमुद चालक पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार आंतर जिल्हा बदलीवर वाशिम जिल्हा पोलीस दलातुन हिंगोली जिल्हा पोलीस दलात हजर होणेकामी या आस्थापनेवर दिनांक ५/१२/२०१६ रोजीचे मा.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्म/नांव/पदनाम/ब.नं. | सद्याची नेमणुक | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|
| १ | चापोना/९९३ हिंमतराव नागोराव सरनाईक | पो.स्टे.वाशिम शहर | वाशिम जिल्हा | हिंगोली जिल्हा |

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/प्रतिनियुक्ती-बीपीआरडी/प्र.क्र.-१५४०/१०३२२/२०१६ वाशिम दिनांक ५/१२/२०१६ अन्वये सहायक संचालक (प्रशासन) भारत सरकार केंद्रिय गृहमंत्रालय पोलीस संशोधन व विकास ब्युरो ब्लॉक नं-११ ,३ रा माळा,सिजीओ परीसर ,नवि दिल्ली यांचे पत्र क्रं. ३/१/२०१६-Adm दि.१९/९/२०१६ ची प्रत सोबत जोडली आहे.तरी जे पोलीस कर्मचारी पोलीस संशोधन व विकास ब्युरो नवि दिल्ली येथे पोशि/जीडी पदावर काम करण्यास इच्छुक असलेल्या कर्मचा-यांचे नामांकन अर्ज प्राप्त करुन घेऊन ते अर्ज आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्राया सह या कार्यालयास दि. ९/१२/२०१६ पावेतो सादर करण्या बाबत कळविण्यात यावे. तसेच उशिराने प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता दप्तरी करण्यात येईल अशी सुचना सकाळ / संध्याकाळ चे गणनेवर देवुन तशी नोंद स्टे.डा.चे साना क्रमांकासह या कार्यालयास न चुकता अहवाल सादर करावा.

**पदोन्नती/नेमणुक :- निरंक.**

**भाग २:-रजा:-**

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/बासंरजा/मपोशि-४९८/१०४४७/२०१६ वाशिम दिनांक ८/१२/२०१६ अन्वये खालील नमुद महिला पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम १९८१ मधिल ७४ च्या तरतुदी नुसार तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अरजा/१४९०/१२/सेवा-९ मुंबई दि.२८ जुलै १९९५ अन्वये प्रसुती रजेला जोडुन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी नांव पदनाम ब.नं. | नेमणुकीचे ठिकाण | मंजुर रजेचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | मपोशि/४९८ चंदा हनुमान सानप | पो.मु.वाशिम | १) ३५ दिवस परावर्तीत रजा.<br>२) २५ दिवस अर्जित रजा अशी एकुण ६० दिवस. |

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/अंररो/सेनि/सपोउपनि-३७६/१०४४८/२०१६ वाशिम दिनांक ८/१२/२०१६ अन्वये वाशिम जिल्हा पोलीस दलामधिल खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास वयाचे ५८ वर्ष पुर्ण

झाल्याने नियत वयोमानानुसार या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांचे रजा खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव व पदनाम | तत्कालीन नेमणुक | सेवानिवृत्तीचा दिनांक | मुळ वेतन | ग्रेड पे/- | अंतिम शिल्लक अर्जित रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | से.नि.सपोउपनि/३७६ साहेराबखान साहेबखान | पो.स्टे.कारंजा ग्रामीण | ३१/०८/२०१६ | १४१५० | २८००/- | ३०० |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पोउपनि/महाजन/२०१६/१०४५० वाशिम दिनांक ८/१२/२०१६ अन्वये पोउपनि सुनिल नाटु महाजन नेमणुक नियंत्रण कक्ष वाशिम यांची कार्यालयीन आदेशान्वये मंजुर असलेली १५ दिवस अर्जित रजा त्यांनी मागणी केल्या प्रमाणे दि.२९/११/२०१६ पासुन १५ दिवस उपभोगण्याची परवानगी देण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आली-३/सिक रजा/मपोशि-७७४/१०३४२ वाशिम दिनांक ५/१२/२०१६ अन्वये मपोशि/७७४ ज्योती खोडके नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर यांचे दि.२/६/२०१६ ते २७/६/२०१६ पावेतो २६ दिवस सिक कालावधिच्या अहवालामध्ये अध्यक्ष स्थायी वैद्यकीय मंडळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार त्यांची खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

१) दि.२/६/२०१६ ते ८/६/२०१६ पावेतो ७ दिवस परावर्तीत रजा.
२) दि.९/६/२०१६ ते २७/६/२०१६ पावेतो १९ दिवस विनावेतन(असाधारण)रजा.

## भाग ३:- बढती/पगार :-

**बढती:- निरंक.**

**पगार :-**

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/नवनियुक्त पो.शि-२०१६/डीसीपीएस/१०४२३/२०१६ वाशिम दिनांक ७/१२/२०१६ अन्वये वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस भरती -२०१६ मध्ये पोलीस शिपाई पदी अंतिम निवड करण्यात आलेल्या खालील नमुद नवनियुक्त उमेदवार यांची वैद्यकीय तपासणी ,चारीत्र्य पडताळणी मध्ये पात्र ठरल्याने त्यांची पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत वेतन संरचना पी-१, वेतन बँड रुपये ५२००-२०२००/-मध्ये वेतन रु.६४६०/- ग्रेड वेतन रुपये -२०००/- अधिक विशेष वेतन रुपये ५००/- आणि त्यावर देय असलेले अन्य भत्ते व अटी व शर्तीच्या आधिन राहुन नियुक्ती करण्यात आली आहे. ते पो.मु.वाशिम येथे त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कर्तव्यावर हजर झालेले आहे. त्यांचे **Office of The SRKA Form**-१ मध्ये माहिती भरुन ३ प्रतित पाठविण्यात येत आहे. कृपया अंशदायी सेवा निवृत्ती वेतनाचे सदस्य बाबतचे डीसीपीएस खाते क्रमांक मिळणे बाबत विनंती आहे.

| अ.क्र. | ब.नं. | उमेदवाराचे नांव | कर्तव्यावर रुजु झाल्याचे दिनांक | साना क्रमांक/वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | ३७६ | संतोष सुभाष चव्हाण | २७/१०/२०१६ | २४/१६= ९.१५ वा |
| २ | ३९२ | सुरज लक्ष्मण काकडे | २७/१०/२०१६ | २४/१६= ९.१५ वा |
| ३ | १२२९ | अविनाश भिमराव वाढे | २६/११/२०१६ | १२/१६= १०.४५ वा |

## भाग ४ बक्षिस:-निरंक.

## भाग ५:- शिक्षा/परवानगी :-

**परवानगी :-**

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/परीक्षा परवानगी/पो.कर्मचारी/१०४५२/२०१६ वाशिम दिनांक ०८/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या परीक्षेला बसण्याची परवानगी महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणुक) नियम-१९७९ अन्वये शासकीय कर्तव्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही या अटीचे आधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचारी नांव | नेमणुक | परवानगी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि | १८५ | केदेश्वर विठ्ठल फुलंबरकर | पो.मु.वाशिम | विक्रीकर निरीक्षक पदाचे परीक्षेस बसण्याची परवानगी |
| २ | पोशि | २६३ | उज्वल देशमुख | वाचक शाखा | उपलेखापाल परीक्षा व तलाठी परीक्षेस बसण्याची परवानगी |
| ३ | पोशि | १३०६ | रुपेश भगवान तायडे | पो.मु.वाशिम | विक्रीकर निरीक्षक पदाचे परीक्षेस बसण्याची परवानगी |
| ४ | मपोशि | १४१५ | वृषाली अरुण ढगे | पो.मु.वाशिम | बि.ए.अंतिम परीक्षेस बसण्याची परवानगी |

आदेश क्रमांक उपविपोअ/शिक्षा/पोहवा-६०५/३१९९/२०१६ कारंजा दिनांक ७/१२/२०१६ अन्वये दिनांक २८/११/२०१६ रोजी वॉकी टॉकी वर कॉल दिला असता पो.स्टे.कारंजा शहर येथे नेमणुकीस असलेले पोहवा/६०५ रामेश्वर हलवणे यांनी BM-३ मध्ये डयुटी दरम्यान कॉलचे उत्तर न दिल्याने त्यांचा खुलासा मागविण्यात आला होता.पोहवा/६०५ यांनी खुलासा सादर केला की आम्ही १९.३० वा दरम्यान पो.स्टे.ला आलो परंतु वॉकी टॉकी वर दिलेला कॉल ऐकायला आला नाही करीता उत्तर देवु शकलो नाही. पोहवा/६०५ यांनी सादर केलेला खुलासा संयुक्तीक व समाधान कारक वाटत नसल्याने व त्यांना कसुर मान्य आहे असे गृहीत धरुन नमुद कसुरी बददल त्यांना सक्त ताकीदची शिक्षा देणे बाबत अंतिम आदेश काढण्यात येत आहे. कसुरदार या निर्णयाने व्यथीत झाले असल्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचेकडे ६० दिवसाचे आत अपील करु शकतात.

आदेश क्रमांक उपविपोअ/शिक्षा/पोहवा-५७९/३२००/२०१६ कारंजा दिनांक ७/१२/२०१६ अन्वये दिनांक २८/११/२०१६ रोजी वॉकी टॉकी वर कॉल दिला असता पो.स्टे.कारंजा शहर येथे पोलीस मुख्यालय वाशिम येथुन बंदोबस्ता करीता आलेले पोहवा/५७९ महेंद्रसिंह रजोदिया यांनी BM-२ मध्ये डयुटी दरम्यान कॉलचे उत्तर न दिल्याने त्यांचा खुलासा मागविण्यात आला होता.त्यांनी खुलासा सादर केला की आम्ही २०.०० वा दरम्यान भारतीपुरा या परीसरात पेट्रोलींग केली त्या भागात निवडणुक उमेदवार संबंधाने बरीच गर्दी झालेली असल्याने वॉकी टॉकी वर दिलेला कॉल ऐकायला आला नाही करीता उत्तर देवु शकलो नाही. त्यांनी सादर केलेला खुलासा संयुक्तीक व समाधान कारक वाटत नसल्याने व त्यांना कसुर मान्य आहे असे गृहीत धरुन नमुद कसुरी बददल त्यांना सक्त ताकीदची शिक्षा देणे बाबत अंतिम आदेश काढण्यात येत आहे. कसुरदार या निर्णयाने व्यथीत झाले असल्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचेकडे ६० दिवसाचे आत अपील करु शकतात.

आदेश क्रमांक उपविपोअ/शिक्षा/पोहवा-५३२/३१९८/२०१६ कारंजा दिनांक ७/१२/२०१६ अन्वये पो.स्टे.मानोरा येथे दाखल अपक्रं.२६०/२०१६ कलम ३२६ भांदवी चे कागदपत्र पडताळणी दरम्यान पोहवा/५३२ शिवचंद राठोड नेमणुक पो.स्टे.मानोरा यांनी सरकारी पंच न घेतल्या बाबत खुलासा मागविण्यात आला होता.पोहवा/५३२ यांनी दि.१५/११/२०१६ रोजी खुलासा सादर केला की सदर प्रकरणी आम्ही अनावधानाने सरकारी पंच नघेता स्थानिक पंच घेतले ही आमची चुक आहे हे आम्ही मान्य करतो. या वरुन पोहवा/५३२ यांना कसुर मान्य आहे असे गृहीत धरुन त्यांना अंतिम आदेशाद्वारे रुपये २४/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. कसुरदार या निर्णयाने व्यथीत झाले असल्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचेकडे ६० दिवसाचे आत अपील करु शकतात.

आदेश क्रमांक उपविपोअ/मवि/शिक्षा आदेश/२६१५/२०१६ मंगरुळपिर दिनांक ९/१२/२०१६ अन्वये आपण पोकॉ/८८५ अफसर रायलीवाले पो.स्टे.मंगरुळपिर आपणास आरटीपीसी यांनी दैनिक अहवालात परीपुर्ण माहिती घेणे बाबत दिनांक १८/९/२०१६ व दि.४/१०/१६ रोजी लेखी आदेश असतांनाही आपण आदेशाची अवहेलना करुन आरोपी अटके बाबतची माहिती घेतली नाही त्या बाबत या कार्यालयाचे पत्र कादानो जा.क्र.२५७७/१६ दि.५/१२/२०१६ नुसार आपला खुलासा मागीतला असता मुदतीत प्राप्त झाला अवलोकन केले असता समाधान कारक नसल्याने अमान्य करण्यात आले आहे.सदरचे अंतिम आदेशाद्वारे आपणास रुपये २४/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. कसुरदार या निर्णयाने व्यथीत झाले असल्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचेकडे ३० दिवसाचे आत अपील करु शकतात.

आदेश क्रमांक उपविपोअ/मवि/शिक्षा आदेश/२६००/२०१६ मंगरुळपिर दिनांक ८/१२/२०१६ अन्वये आपण पोहेकॉ/६४३ दिपक रजोदिया पो.स्टे.आसेगांव आपणास दि.१९/११/२०१६ रोजी पो.स्टे.आसेगांवचे वार्षीक निरीक्षण दरम्यान घेण्यात आलेल्या लाठी परेडवर सर्व कर्मचारी यांना लाठी सोबत आणण्याचे टाळले. त्या बाबत आपणास कादानो दि.४/१२/१६ रोजी बजावुन सुध्दा स्पष्टीकरण सादर केले नाही. वरील कसुरी केल्याचे स्पष्ट होत असल्याने सदरचे अंतिम आदेशाद्वारे आपणास रुपये २४/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. कसुरदार या निर्णयाने व्यथीत झाले असल्यास मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांचेकडे ३० दिवसाचे आत अपील करु शकतात.

## भाग ६- निलंबन/प्रशिक्षण व इतर:-

## निलंबन:- निरंक.

### प्रशिक्षण:-

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/डीटीएस/प्रशिक्षण/सत्र क्रं.२०९/निवड गुन्हे शाखा कर्म/२०१६/१०३८५ वाशिम दिनांक ६/१२/२०१६ अन्वये गुन्हेदोष सिध्द प्रमाण वाढविण्याचे प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे दिनांक १४/१२/२०१६ ते ३/१/२०१७ पावेतो आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणा करीता उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी त्यांचे उपविभागातील क्राईम ब्रँच मध्ये काम करणारे पैकी ०३ पोलीस कर्मचारी यांची निवड करुन त्यांची वैद्यकीय तपासणी करुन नमुद प्रशिक्षणा करीता रवाना करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

आदेश क्रमांक पोअवा /आशा-४/प्रशिक्षण/INSER-BATCH-NO-४१,४२/नाशिक,राखीव/२०१६/१०३८४ वाशिम दिनांक ६/१२/२०१६ अन्वये गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथे "सेवांतर्गत प्रशिक्षण " " सत्र क्रमांक-४१, " दहशतवाद व बॉम्ब ब्लास्ट प्रकरणांचा तपास" " सत्र क्रमांक-४२ " दंगली बाबत गुन्हयांचा तपास"या विषयावर गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथे दिनांक ०८/१२/२०१६ ते ०९/१२/२०१६ पावेतो २ दिवसा करीता पो.स्टे. धनज येथील बिट मध्ये काम करणारे कर्मचा-यांपैकी ०२ कर्मचारी यांची निवड करुन त्याच पो.स्टे.चे ०२ कर्मचारी यांना राखीव ठेवण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/प्रशिक्षण/ICT-निवड/नापोकॉ/४६-उलेमाले/२०१६/१०३३१ वाशिम दिनांक ५/१२/२०१६ अन्वये महाराष्ट्र इंटेलीजन्स ॲकडमी MIAपुणे द्वारा आयोजीत ५ दिवसाचे इन्टेजन्स कलेक्शन टेक्निक्स चे प्रशिक्षण दिनांक १३/१२/२०१६ ते १७/१२/२०१६ पावेतो कालावधित आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणा करीता नापोकॉ/४६ संजय पंढीतराव उलेमाले नेमणुक पो.स्टे.वाशिम शहर यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

### इतर:-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/पोभ-२०१६/वैद्य तपा/१०४९७/२०१६ वाशिम दिनांक ९/१२/२०१६ अन्वये वाशिम जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया २०१६ करीता एकुण ३४ उमेदवारांची गणवत्तेनुसार निवड करण्यात आलेली आहे. त्यातील खालील नमुद उमेदवार यांची इमाव -माजी सैनिक प्रतिक्षा यादी मधुन निवड करण्यात आल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी करण्याचे अगोदर त्यांचे मुळ शैक्षणीक कागदपत्र प्रमाणपत्र (जे आवेदन करते वेळी नमुद केले होते) तसेच विवाहित उमेदवारांचे महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र )नियम-२००५ चे प्रतिज्ञापत्र तसेच पोलीस शिपाई पदावर निवड झालेलया उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधित्त अथवा प्रशिक्षण संपल्यायंतर पुढील तीन वर्षात पोशि या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास व सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडुन प्रशिक्षणावर झालेल्या सर्व खर्च प्रशिक्षण कालावधित अदा केलेल्या वेतन व भत्ता सहित देय रक्कम भरणा करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचे बंधपत्र(बॉन्ड हमीपत्र) घेवुन राखीव पोलीस निरीक्षक पो.मु. वाशिम यांचेकडे दिनांक १४/१२/२०१६ पर्यंत सादर करण्या बाबत कळविण्यात यावे.तसेच वैद्यकीय तपासणी करवुन घेणे कामी त्यांचे कडील ३ पासपोर्ट साईजचे फोटोसह दि. १५/१२/२०१६ चे ८.०० वा नविन पोलीस मुख्यालय चिखली रोड वाशिम येथे न चुकता हजर राहणे बाबत समज दयावी.

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नांव | संपुर्ण पत्ता | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०१६ | दिपक यादवराव गाडे | रा. पो.लोणी, ता.रिसोड.जि.वाशिम. | ९१५८७२९९३८ |

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/पुर्नविलोकन/१०४९८/२०१६ वाशिम दिनांक ९/१२/२०१६ अन्वये तृतीय श्रेणीच्या ज्या पदांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन नियम १९८२ च्या नियम १०(४) अन्वये विभाग प्रमुख समुचित प्राधिकारी (नियुक्ती प्राधिकारी) आहेत अशर पदांच्या धारकांची वयाच्या ५५ व्या वर्षापलीकडे तसेच नियम ६५ नुसार ज्यांची अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पुर्ण झाली आहेत. अशांच्या बाबत सेवेत राहण्याची पात्रता ही समीती अजमाविल व आपल्या शिफारसी समुचित प्राधिका-यांना म्हणजेच विभाग प्रमुखांना सादर करण्या करीता आमच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठील करण्यात येत आहे.

१) श्रीमती स्वप्ना गोरे अपर पोलीस अधिक्षक वाशिम. -अध्यक्ष

२) श्री. आर.व्ही.गांगुर्डे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत विभाग वाशिम - सदस्य.

३) श्री.के.जी.बावने प्रभारी कार्यालय अधिक्षक तथा प्रमुख लिपीक आस्थापना शाखा - सचिव.

२/- वर नमुद अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी हे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सकाळी ११.०० वाजता पोलीस कम्रचा-यांचे पुर्नविलोकन करीता आमच्या कक्षात उपस्थित रहावे.

(प्रशांत होळकर)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रत/-

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/ सर्व ठाणेदार /सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई मेल द्वारे"त्वरीत कळवावे.

प्रत /- "ई मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीक यांना योग्य कार्यवाहीस.

***************